# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@gmail.com Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक: २अ/एडीएम/२०१६/१००८
दिनांक : 01 AUG 2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे

विषय : एम.एचएमसीटी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेची समुपदेशन फेरी आयोजित करण्याबाबत...

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया सुरू आहेत. त्याअंतर्गत प्रथम वर्ष एम.एचएमसीटी. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी दिनांक ६.८.२०१६ रोजी समुपदेशन फेरी आयोजित करून प्रवेश करण्यात येणार आहेत. त्यासाठी आपल्या विभागांतर्गत येणा-या महाराष्ट्र राज्य हॉटेल मॅनेजमेंट अॅड कॅटरिंग टेक्नॉलॉजी,पुणे या संस्थेत सदर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणा-या पात्र उमेदवारांपैकी ज्यांनी ऑनलाइन अर्ज केलेले आहेत त्यांचे कागदपत्र पडताळणी, त्या उमेदवारांची प्रोव्हिजनल गुणवत्ता यादी, या यादीबाबत काही तक्रारी असल्यास त्यांचे निराकरण करून अंतिम गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे व अंतिम गुणवत्ता यादीनुसार समुपदेशन फेरीद्वारे प्रवेश करणे इत्यादी कार्यवाही करावयाची आहे. याबाबतचे सविस्तर वेळापत्रक मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी क्रमांक CETCELL/M.HMCT-Notice/२०१६/३३४, दिनांक ३०.७.२०१६ अन्वये प्रसिध्द केलेले असून संचालनलायाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. (सोबत त्याची प्रत जोडली आहे)

एम.एचएमसीटी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी समुपदेशन फेरीसाठी आपण नियंत्रक अधिकारी म्हणून काम पहावे. तसेच समुपदेशन फेरीद्वारे (Councelling Round) प्रवेश करण्यासाठी महाराष्ट्र राज्य हॉटेल मॅनेजमेंट अॅड कॅटरिंग टेक्नॉलॉजी,पुणे या संस्थेत आवश्यक ती यंत्रणा तयार ठेवण्याबाबत व ही प्रवेश फेरी पारदर्शीपणे आणि बिनचुकपणे पार पडेल याची दक्षता घेण्याबाबत आपल्या स्तरावरून संस्थेस कळविण्यात यावे.

गुणवत्ता यादी , प्रवेशित उमेदवारांची प्रवेशाची यादी त्वरीत या कार्यालयास पाठविण्यात यावी जेणेकरून सदर उमेदवारांची Online प्रणालीत माहिती भरून उमेदवारास संगणकीकृत Allotment Letter देण्यात येईल. तसेच ARC कडे Seat Acceptance करता येईल. याकरिता प्रवेशाच्या विवीध टप्प्यावरील माहिती पाठविण्यात यावी.

आपला,

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत -माहितीसाठी सादर :

१. मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
२. मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य,मुंबई ४०००५१
३. प्राचार्य,महाराष्ट्र राज्य हॉटेल मॅनेजमेंट अॅड कॅटरिंग टेक्नॉलॉजी,पुणे, यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी